Vol 6 Issue 10 Nov 2016

ISSN No : 2230-7850

International Multidisciplinary Research Journal

# *Indian Streams Research Journal*

Executive Editor
Ashok Yakkaldevi

Editor-in-Chief
H.N.Jagtap

**Welcome to ISRJ**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

**Regional Editor**

Dr. T. Manichander

Mr. Dikonda Govardhan Krushanahari
Professor and Researcher ,
Rayat shikshan sanstha's, Rajarshi Chhatrapati Shahu College, Kolhapur.

## *International Advisory Board*

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.org**

ISSN: 2230-7850 Impact Factor :4.1625(UIF) Volume - 6 | Issue - 10 | November - 2016

Indian Streams Research Journal

# मध्यप्रदेश मधील महान लोकसंस्कृतीक परंपरा व लोक संगीताचे विविध प्रकार

प्रा. सुनिल बाबुलालजी पटके[1] , डॉ. शिरिष व्ही कडु[2]
[1]संगीत विभाग कला महाविद्यालय अकोला , मलकापुर ता. जि. अकोला.
[2]संगीत विभाग श्री. शिवाजी कला, वाणिज्य व , विज्ञान महाविद्यालय अकोला.

## प्रस्तावना :–

लोकसंगीताची पारंपरा विषद करीत असतांना महान लोक संगीतकार, लोकसाहित्यीक, संगीत विद्वान 'निसर्ग हा प्रथम गुरू मानतात, निसर्गाने मानसाला जीवन जगण्याची कला व राहण्याची पद्धती शिकविलेली आहे. तसेच निसर्गानेच अनेक विविध कला शिकण्यास प्रोत्साहित आणि रसस्वाद घेणे शिकविले आहे. निर्सगानेच लोकसंगीत आणि लोकगीताची निर्मिती कारण्याकरीता मानसाला प्रेरीत केले आहे. मध्यप्रदेश हे भारतातील एक विशाल राज्य म्हणूनच प्रसिद्ध नसुन, हे राज्य एक अनुसूचित जाति व अनुसूचित जमाती प्रधान राज्य आहे. या राज्यामध्ये बुंदेलखंड, मालवा, निमाड आणि बघेलखंड असे सांस्कृतिक प्रादेशिक विभाग आहेत, त्यामुळेच मध्यप्रदेशात प्रादेशिक विभागानुसार वेळ आणि साधन सामुग्रीनुसार विविध ऋतुमध्ये, सन, उत्सव आणि सांस्कारिक अनुष्ठानामध्ये वेगवेगळ्या लोकगीतांचे प्रचलन आहे. मध्यप्रदेशातील विविध प्रादेशिक विभागात, विभागानुसार तेथील लोक–बोली किंवा लोकभाषा यानुसार लोकसंगीताचे गायन, वादन आणि नृत्य केल्या जातात.

## संशोधनाची आवश्यकता :

भारतीय संस्कृती ही जगातील एक महत्त्वपूर्ण संस्कृती आणि सभ्यता आहे. भारतीय संस्कृती आणि समाज यांचा अभ्यास अनेक पातळीवर होत आहे. भारतीय संस्कृती मध्ये अत्यंत महत्त्वपूर्ण स्थान हे मध्यप्रदेश राज्याचे आहे. लोकसंगीत हे लोकजीवनातील महत्वाचा धागा आहे. भारतातील प्रत्येक प्रदेशाची संस्कृती ही स्वतःच समृद्ध होत असते, जर या संस्कृतीचे गहण अध्ययन केल्यास त्यामध्ये शेकडो दुर्लभ सांस्कृतीक आणि समाज उपयोगी तथ्य मिळतात. स्वछंद वातावरणात वाढणाऱ्या लोकसंस्कृतीमध्ये सुक्ष्मतेने पाहिल्यास त्यामध्ये दडलेली शक्ती ही आधुनिक तंत्रज्ञान, आधुनिकीकरणाच्या वातावरणात वाढणाऱ्या व भटकटत चाललेल्या प्रौढ व युवावर्गाकरिता लोकसंगीत व लोक संस्कृतीचा मार्ग पथप्रदर्शक सिद्ध होईल यात शंका नाही, कारण असे की लोकसंगीत हे एकात्मता, एकाग्रता, परस्परामध्ये सलोख्याची व सामंजश्याची भावना वृधींगत करण्यास प्रोत्साहित करते व या प्रोत्साहनाची आज आधुनिक व धकाधकीच्या जीवनात अत्यंत आवश्यकता आहे. म्हणूनच भारतातील वेगवेगळ्या राज्यांच्या स्थानिक लोक संस्कृती, लोकसंगीत यावर नव्याने प्रकाश टाकण्याची आज आवश्यकता आहे, ज्यामूळे वेगवेगळ्या राज्यांतील वेगवेगळ्या प्रकारच्या लोकसंगीताकडे संशोधन क्षेत्र म्हणुन पाहिल्या जाईल व नव–नविन संशोधन नव–नविन दृष्टीकोनातुन संशोधनाच्या दिशा ठरवतील व त्यांच्या माध्यमातुन आपल्या लोकसंस्कृतीचे व प्रादेशिक लोकसंस्कृतीचे तसेच अनेक वेगवेगळ्या प्रकारच्या लोकसंगीताचे जतन व संर्वधन होईल, म्हणून भारतातील वेगवेगळ्या संस्कृतीक राज्यांचा अभ्यास करून तेथील प्रादेशिक विभागानुसार लोकसंगीताच्या प्रकाराचा अभ्यास करणे आवश्यक आहे असा संशोधकाचा दृष्टीकोन आहे.

प्रस्तुत शोध निबंधामध्ये मध्यप्रदेशा–तील लोकसंगीताचे प्रादेशिक विभागानुसार संगीताचे प्रकार, त्यांच्या लोकगीतांची वैशिष्ट्ये व मध्यप्रदेशाची महान लोकसंस्कृतीची पारंपरा यावर शोधमुलक अध्ययन करण्यात येणार आहे, हे कार्य भावी पिढीच्या मनात मध्यप्रदेशाची महान लोकसंस्कृती व तेथील विविध प्रकारच्या लोकसंगीताचे स्थान कायम ठसविल आणि या क्षेत्रामध्ये कार्य करण्याकरिता संशोधकांना, नवोदित विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करेल यात शंका नाही. म्हणून या विषयावर नव्याने संशोधन करण्याची आवश्यकता आहे असे संशोधकाचे मत आहे.

## संशोधन पद्धती :

मध्यप्रदेशामधील महान लोक संस्कृतीक परंपरा व लोकसंगीताचे प्रकार हा शोध निबंध, भुतकाळातील व वर्तमान सामाजिक स्थितीमधील वास्तविकता या घटनांवर नव्याने प्रकाश टाकण्याचे कार्य ऐतिहासिक संशोधक पद्धतीमध्ये केल्या जाते.



प्रस्तुत शोध निबंधामध्ये ऐतिहासीक संशोधन व तुलनात्मक पद्धतीचा आवश्यकतेप्रमाणे यथोचित प्रयोग करण्यात आला आहे. प्रस्तुत शोध निबंधाविषयीचे संशोधन साहित्य हे विषयासंबंधीत पुस्तके आणि पत्रिका, मासिके या द्वारा एकत्रित करण्यात आले असुन प्रस्तुत शोध निबंधामध्ये त्यांचा प्रयोग करण्यात आला आहे.

### पारंपारीक लोकसंस्कृती :

मध्यप्रदेश हे एक सांस्कृतीक केन्द्र आहे. त्रिपुरीचे कलचुरी वंशापासुन आधुनिक काळापर्यंत साहित्य आणि कलेचा विकास याच भुभागावर झाला. मध्यप्रदेश एक वैशिष्ट पूर्ण राज्य आहे. वैशिष्ट सांगायचे झाल्यास येथे हिरवीगार वनसंपत्ती आहे, उंच–उंच पर्वत रांगा, नद्या आणि घाट तसेच वाळवंटा सारखा उजाड भाग सुध्दा या मध्ये समाविष्ट आहे. मध्यप्रदेशा मधील सपूर्ण भौगोलिक विस्ताराचे मुख्य चार सांस्कृतीक विभागात विस्तार झालेला आहे. बुंदेलखंड, मालवा , निमाड आणि बुदेलखंड हे प्रदेश मिश्रीत संस्कृतीचे आदर्श स्थान आहे त्यामुळे येथील लोकगीतांवर येथील लोकभाषेचा प्रभाव दिसून येतो लोकसंगीत गायल्या नंतर ते आपल्या प्रादेशिक संस्कृतीचा परीचय करून देतात, कारण की येथील प्रादेशिक लोकबोली–भाषा वेगवेगळी असते. बुंदेली, बघेली, मालवी आणि निमाडी ह्या मध्यप्रदेशातील प्रमुख भाषा असुन हब्बी, भतरी, परजी, माडी, गोंडी ओरॉव, कोरकु, भीली इत्यादी जातीच्या स्वतंत्र वेगवेगळया भाषा आहेत.

लोकसंगीताची भाषा शैलीत गुरफटलेली नसून ती भाषा साधी सोपी असते. ही भाषा लोकजीवनात प्रचलित असल्यामुळे तिच्यात जिवंतपणा आलेला दिसतो. या लोकगीतांच्या भाषेची जोपासना परंपरागत होत असल्यामुळे त्यातून प्राचीन अवशेषांचे दर्शन घडते, लोकजीवनातून साकार झालेले अर्थपूर्ण शब्द हृदयाला स्पर्शकरून जातात. नव्हे ते गोडवा व आत्मियता पुर्णत्वास नेतात. एवढे सामर्थ्य बोली भाषेत आहे. संस्कृतीचा आणि समाजाचा संबंध बिंब–प्रतिबिंबासारखा असतो, ती परस्परपुरकच असतात. प्रादेशिकता बोलीभाषेचा घटक असल्यामुळे त्या–त्या बोलीभाषेतील लोकसाहित्य हे त्या विशिष्ट राज्याचे मौलिक साहित्यधन होऊन जाते. एखाद्या विशिष्ट राज्याच्या सामुदायिक जीवनाच्या इतिहासाचे ते एक उत्कृष्ट प्रतिबिंब असते.

### मध्यप्रदेशातील लोकसंगीताचे वैशिष्ट्ये :

1)लोकसंगीत हे लोकरूपी विश्वातील कणा–कणानी निर्माण झाले आहे आणि समृद्ध होत आहे.
2)लोकसंगीत हे लोकजीवनात दिसून येते.
3)लोकसंगीत हे सामुहिक आणि एकल अश्या दोन्ही पद्धतीने गायल्या जातात.
4)लोकसंगीत गायनामध्ये बालक, म्हातारे (वृद्ध) स्त्री–पुरूष सर्वच हिरीरीने भाग घेतात व त्यांना लोकसंगीत आवळते.
5) लोकसंगीताची प्रकृति ही कोणात्याही बंधनात बंधीस्त नसते ती स्वच्छंद असते आणि शास्त्राच्या नियमानी लोकसंगीताला हानि होते.
6)लोकसंगीत हे उन्मुक्त आणि स्वछंद असते.
7)लोकसंगीत गायनाकरीता कोणत्याही प्रकारच्या समय सिद्धाताची आवश्यकता नसुन जेव्हा मनाला वाटेल तेव्हा लोकसंगीत गाता येते.
8)लोकसंगीताची रचना ही मनुष्याच्या आजु–बाजुच्या दैनंदिन जीवनाशी संबंधीत घटना आणि मनुष्याला लागणाऱ्या गरजेच्या वस्तु इत्यादी विषयासंबंधित असतात व ते विषय साधे–सुधे असतात.
9)लोकसंगीताची धुन ही सरळ व समजन्यास साधी असुन मोजक्या स्वरांनी सजलेली असते.
10)लोकसंगीत हे कोणत्याही प्रकारच्या सौंदर्य वाढविणाऱ्या वस्तुची प्रतिक्षा नसते परंतु लोक वाद्य हे लोकगीतामध्ये जीवंतपणा निर्माण करतात.
11)प्रकृतीचे दर्शन हे लोकगीतांच्या भाषामध्ये अंतभुर्त असतात.
12)लोकसंगीत हे संपूर्ण जनतेचे आवडते असतात.
13)लोकसंगीत हे निर्मळ फुलाप्रमाणे आणि शीतल पाण्याप्रमाणे सुख व आनंद देणारे असते.
14)लोकसंगीत हे मौखिक आणि वांचिक परंपरेने मागील पीढीकडून पुढच्या पीढीमध्ये हस्तांतरीत होत असते.
15)लोकसंगीत हे कोणत्याही एका व्यक्तीची संपत्ती नसते.
16)लोकसंगीतामध्ये मोठ्या आवाजामध्ये हाक आणि टेर दिल्या जातात.
17)लोकसंगीत हे कोणत्या–ना–कोणत्या प्रकारचा बोध देणारे असते आणि ललित साहित्य प्रदान असते.
18)लोकसंगीत हे त्या प्रदेशाच्या संस्कृती, संस्कार आणि परंपरेचे संवाहक असतात.
19)लोकसंगीता मध्ये बारहमासी सुगंध दर्वळत असतो.
20)लोकसंगीता मध्ये वैशिष्ट्य पूर्ण दर्शनशास्त्र आणि मानसशास्त्राचे रहस्य दिसुन येतात.
21)लोकसंगीत हे लोकचेतनेचे संवाहक आहेत.
22)लोकसंगीत हे प्रत्येक रसामध्ये गायल्या जातात, परंतु श्रृंगार रसामध्ये गायील्या जानाऱ्या लोकगीताची छटा ही निराळीच असते.

### लोकसंगीताचे विविध प्रकार :

#### संस्कार गीत :

संस्कार हे समाजातील आंतरीकव्यवस्थेचे संवाहक आहे. समाजातील पारंपारीक संबंधावर यांचा खुप खोलवर प्रभाव पडत असतो. संस्कारांनुसारच संबंधांचे स्वरुप फुलत जातात. संस्कार संबंधी सर्वच लोकगीता मध्ये सर्वाधिक संख्या ही विवाह संस्कार गीतांची असते. मध्यप्रदेशातील लोकगीत संस्कार संबंधीत लोकविचारानुसार आणि चालीरीती प्रमाणे आपल्या प्रादेशिक वैशिष्ट्यांनी सजलेले आहे. विवाह संस्कार ही मानवाच्या जिवनातील अतिशय महत्वपूर्ण सांस्कारीक प्रक्रीया आहे. विवाह हा संस्कार मध्यप्रदेशातील सर्वच प्रादेशिक भागात सारखाच असतो, याकरीता एक पारंपारीक रीत आहे, ज्याला बुंदेलखंडमध्ये 'मॉगरमाटी' छत्तीसगढ मध्ये 'चुलमाठी', मालवा मध्ये 'माता पुजन', बुंदेलखंड मध्ये 'माठीमॉगर' आणि निमाड मध्ये 'खनमाटी' म्हणतात.

### बुंदेलखंड मधील विवाह गीत :

विवाह होण्यापूर्वी उभय पक्षाकडे 'बनरा–बनरी' गीत गातात त्याच बरोबर मुॅदनोगीत, करइया की गारी, हल्दी गीत, तेलगीत, बन्ना–बन्नी गीत, चीकट के गीत, दुल्हा निकासी के गीत, बन्नागीत, बारात प्रस्थान एवं आगमन के गीत, द्वारचार के गीत, चढाव के गीत, भॉवर के गीत, सुहाग का गीत, पॉव पखराई के गीत, कन्यादान के गीत, धान बुवाई के गीत, जेवनार की गारी कुॅवर कलेषा की गारी विदा गीत, कंकण छुडाई के गीत, मोचायनो के गीत याच प्रकारे छत्तीसगढ मधील विवाहाची गाणी आहेत, तसेच मालवा बंदेलखंड, निमाड यांचे सुध्दा वेगवेगळे विवाह गीत प्रकार आहेत.

### जन्म संस्कार गीत :

मध्यप्रदेश मधील जन्म संस्काराचे गीत वेगवेगळे गीत आहेत, या भुतलावर जेव्हा मुलगा किंवा मुलगी जन्म घेतो तेव्हा त्याच्या आई वडीलांना तसेच कुंटुबातील प्रत्येक व्यक्तीला आनंद होते हा आनंद उत्साह व्यक्त करण्याकरिता सर्वात महत्वाची भुमीका ही तेथील स्थानीक लोकगीत करीत असतात. गर्भधारणे पासुनच स्त्रींया गीत गायला सुरु करतात. परंतु बाळाच्या जन्माच्या वेळी लोकगीत आणि लोकनृत्य केल्या जातात. आदीकाळा पासुन पीढी–दर–पीढी गायले जानारे लोकगीत जन्म संस्कारा संबंधीत आपल्या परंपारीकतेचे प्रमुख अण बणले आहे. मध्यप्रदेश लोकसंगीत आणि गीत नृत्यांचा धनी आहे. जन्म संस्कार गीत येथील चार 'सांस्कृतीक प्रादेशिक' विभागात प्रादेशिक मान्यतेनुसार प्रथा आणि परंपरामध्ये प्रचलित आहेत. उदा. बुंदेलखंड मध्ये जन्म संस्कार गीत पुढील प्रमाणे आहेत, संचत गीत, सरिया गीत भौ लोटनी, सोहर गीत, पालना या झुला गीत कुऑ पूजन का गीत इत्यादी गीते गायली जातात याच प्रकारे मालवा, निमाड बघेलखंड मध्ये सुध्दा जन्म संस्कार गीत प्रसिध्द आहेत.

### मृत्यु संस्कार गीत :

मध्यप्रदेश मधिल मृत्यु संस्कार गीत सुध्दा गायल्या जातात ''आया है सो जायेगा राजा रंग फकीर'' हे काव्य मध्यप्रदेश मध्ये लोक–स्वीकृत आहे. आपल्या कुंटुबा मधील व्यक्ती मृत्यु पावली तर आपल्याला अत्यंत दुःख होते, अशा क्षणी आपल्याला ईश्वराचे स्मरण होते. त्या ईश्वराच्या हातामध्ये आपले जीवन चक्र असते. ईश्वराला स्मरण करण्याचा सहज व सोपा मार्ग म्हणजे लोकभजन हा आहे. विविध संस्कारा प्रसंगी वेगवेगळे लोकगीत गायल्या जातात ती लोकपरंपरा आहे. परंतु या अंतिम संस्कारा मध्ये लोकगीत हे अनिवार्य नसतात ''डॉ. मोतीलाल चौरसिया के अनुसार मृत्यु संस्कार तो नाम के लिये होता है, इससे हमारी चिंता, व्यथा हि बढाती है, इसलिये इसे शुभ संस्कारो में शामिल नहि किया जाता है''.

बुंदेलखंड, निमाड, मालवा, बघेलखंड, भारिया जनजाती, कोरकु इत्यादी भागातील लोक आपल्या परंपरेनुसार भजन, निर्गुण भजन गातात.

### उपसंहार :

प्रस्तुत शोध निबंधामध्ये मध्यप्रदेश मधील महान लोकसंस्कृतीक परंपरेचा आढावा घेऊन ऐतिहासीक महत्त्व स्पष्ट करण्यात आले आहे. मध्यप्रदेश मध्ये सांस्कृतिक प्रादेशिक विभाग आहेत त्या विभागानुसार लोकसंगीताचे सुद्धा बुंदेलखंड, बघेलखंड, मालवा, निमाड असे सांस्कृतिक विभाग पडले आहेत, तेथील लोकसंगीतामधील वैशिष्टे आणि लोकसंगीताचे विविध प्रकार याच्या सखोल अभ्यासपुर्वक विवेचन करण्यात आले आहे. जन्म संस्कार, विविह संस्कार, मृत्यु संस्कार इत्यादी संस्काराच्या वेळी वेगवेगळ्या प्रकारचे गीत गायल्या जातात, त्या गीताचे अभ्यासपुर्वक वर्णन प्रस्तुत शोध निबंधामध्ये करण्यात आले आहे.

### संदर्भ ग्रंथ सुची :

1)लोकसंगीत शास्त्र – डॉ. अशोक दामोदर रानडे
2)शास्त्रीय संशोधन पद्धती – डॉ. बी. एक. कऱ्हाडे
3)मध्यप्रदेश का लोकसंगीत – शरीक मोहम्मद
4)हिन्दु संस्कार – डॉ. राजबली पांडे
5)बुन्देलखंडी एंव बघेलखंडी लोकगीतों का तुलनात्मक अध्ययन – डॉ. विनोद तिवारी
6)लोक साहित्य – श्री इन्द्रदेव
7)लोक साहित्य विमर्श – डॉ. श्याम परमार
8)लोक साहित्य स्वरूप आणि विवेचन – डॉ. पुरूषोत्तम कालभूत

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- Google Scholar
- EBSCO
- DOAJ
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Indian Streams Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.org